कर्मयोग (कर्माच्या माध्यमातून ईश्वरप्राप्ती) : खंड ६

# सकाम कर्म, निष्काम कर्म, कर्मफलत्याग आणि अकर्म कर्म

मराठी (Marathi)

**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

पू. संदीप गजानन आळशी

## सनातन संस्था


卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**मे २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ६९ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १५.५.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५८ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ 'भारत गौरव पुरस्कार' देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. कर्म आणि कर्माचे परिणाम** ९

१ ई. संचित आणि प्रारब्ध यांची निर्मिती १०

**२. कर्मफळ** ११

२ इ. पापकर्म आणि पुण्यकर्म यांनुसार मिळणारी फळे १४

२ ई. पापपुण्याच्या प्रमाणानुसार मृत्यूनंतरची गती १५

२ ए. त्रिगुणाप्रमाणे मिळणारे कर्मफळ १७

२ अं. कर्मफळाच्या अवधीनुसार कर्माचे प्रकार २३

**३. सकाम कर्म** ३२

**४. निष्काम कर्म, कर्मफलत्याग आणि अकर्म कर्म या संज्ञांविषयी** ३३

**५. निष्काम कर्म** ३४

**६. कर्मफलत्याग** ४३

**७. अकर्म कर्म (ज्ञानोत्तर कर्म)** ४४

७ आ. कर्म 'अकर्म कर्म' होण्याविषयीचे विवेचन ४५

७ इ. अकर्म कर्माचे महत्त्व आणि फायदे ४७

७ उ. खोटे बोलण्याच्या पापाचे अकर्म कर्म होणे ५३

**८. कर्मयोगातील टप्पे** ५६

**卐 ‘निष्काम कर्मा’विषयीचे सखोल ज्ञान** ५८

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ५९

---

**टीपा** १. ग्रंथात अन्य संदर्भग्रंथ, तसेच लिखाण यांतून काही सूत्रे घेतली आहेत. अशा सूत्रांच्या अंती लहान अक्षरांत कंसात संदर्भक्रमांक घातले आहेत. त्याचे विवरण ग्रंथाच्या शेवटी ‘संदर्भसूची’मध्ये दिले आहे.

२. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

---

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !


जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाध्यांनी संबोधले जात आहे. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## मुखपृष्ठ संकल्पना

व्यावहारिक इच्छेने आणि फळाच्या अपेक्षेने जे कर्म केले जाते, ते ‘सकाम कर्म’, तर अनासक्त होऊन, कर्तेपणाच्या जाणिवेशिवाय आणि फलाशेचा त्याग करून जे कर्म केले जाते, ते ‘निष्काम कर्म’ होय. सकाम कर्मात स्वार्थ असल्याने ‘संकुचितपणा’ हे त्याचे लक्षण आहे, तर निष्काम कर्मात परार्थ असल्याने ‘व्यापकता’ हे त्याचे लक्षण आहे. याचे प्रतीक म्हणून मुखपृष्ठावरील चित्रात सकाम कर्माच्या ठिकाणी दर्शवलेले झाड निष्काम कर्माच्या ठिकाणी दर्शवलेल्या झाडाच्या तुलनेत लहान आहे. सकाम कर्मात ‘आसक्ती’ असते आणि आसक्तीचा शेवट असमाधान, अशांती यांच्या प्राप्तीत होतो. याउलट निष्काम कर्मात ‘त्याग’ आहे आणि त्यागाचा शेवट आनंदप्राप्तीत होतो. याचे प्रतीक म्हणून सकाम कर्माच्या ठिकाणी खडकाळ जमीन आणि शुष्क प्रदेश दर्शवला आहे, तर निष्काम कर्माच्या ठिकाणी हिरवळ असलेली जमीन आणि वृक्षलतांनी ‘सुजलाम् सुफलाम्’ झालेला प्रदेश दर्शवला आहे. निष्काम कर्म करणाऱ्याचा अखंड नामजप सुरू असल्यास कर्म करूनही ते न केल्यासारखे होते, म्हणजेच ‘अकर्म कर्म’ होते आणि असे कर्म जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकवत नाही. निष्काम कर्मयोग हा साक्षात भगवान श्रीकृष्णाने प्रतिपादिलेला असल्याने त्याचे आचरण करणाऱ्यावर श्रीकृष्णाची कृपादृष्टी असणे, हे साहजिकच आहे.

**योग्य त्या नामजपाद्वारे उन्नतीचा मार्ग दाखवणारे सनातनचे ग्रंथ !**

- **नामजपाचे महत्त्व आणि लाभ**
- **नामजप कोणता करावा ?**
- **नामजप करण्याच्या पद्धती**



## मनोगत

कुडीत प्राण असेपर्यंत मनुष्याकडून कर्म होतच रहाते; किंबहुना ते त्याला करावेच लागते. चांगल्या-वाईट कर्मांचे फळ मनुष्याला मिळतेच. कर्मयोग आचरणाऱ्या मोक्षार्थ्याला कर्म असे करावे लागते की, त्याचे फळच मिळणार नाही; कारण असे कर्म कर्मबंधनात न अडकवणारे असते. असे कर्म टप्प्याटप्प्याने कसे करता येते, याचे दिशादर्शन या ग्रंथात केले आहे.

कर्माचा पहिला टप्पा म्हणजे 'सकाम कर्म'. व्यावहारिक इच्छा, अपेक्षा, भावना इत्यादींमुळे सर्वसाधारण मनुष्याकडून सकाम कर्मेच जास्त होत असतात. उपासकाकडूनही आरंभी सकाम उपासनाच घडत असते. या कर्मामुळे पाप किंवा पुण्य मिळून मनुष्य कर्मबंधनात अडकतो. सकाम कर्म करतांना हळूहळू कर्तेपणाची भावना आणि फलाशा न्यून होत गेली की, 'निष्काम कर्म' करता येते. हा कर्माचा दुसरा टप्पा झाला. निष्काम कर्म दोन प्रकारांनी घडते - मायेतील निष्काम कर्म आणि अध्यात्मातील निष्काम कर्म. मायेतील निष्काम कर्मामुळे, उदा. गरजूला दान दिल्यामुळे पुण्य लागते. याउलट अध्यात्मातील निष्काम कर्म मोक्षसाधनेसाठी केले जात असल्याने त्याद्वारे आध्यात्मिक उन्नती होऊन पापपुण्याच्या पलीकडे जाता येते. मनुष्याला मायेतील कर्मे तर सारखी करावीच लागतात. त्यामुळे पापपुण्याच्या पलीकडे जाण्याचा उपाय म्हणजे 'कर्मफलत्याग' करणे, म्हणजे कर्माचे फळ ईश्वरचरणी अर्पण करणे. हा कर्माचा तिसरा टप्पा झाला. जर कर्मच असे केले की, ते कर्म म्हणून गणले गेले नाही, तर त्या कर्माचे फळ मिळण्याचा आणि त्या फळाचा त्याग करण्याचा प्रश्नच येत नाही. असे कर्म करूनही न केल्यासारखे असते. यालाच 'अकर्म कर्म' असे म्हणतात. हा कर्माचा चौथा टप्पा होय. नामजप अखंड करणारा मनुष्य सकाम कर्मातून एकदम अकर्म कर्मातही जाऊ शकतो.

या ग्रंथात दिलेले कर्माचे टप्पे समजून घेऊन त्याप्रमाणे ते आचरणात आणणारा लवकर कर्मबंधनातून मुक्त होवो, म्हणजेच त्याला मोक्षप्राप्ती होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. - **संकलक**